(इंग्रजीमध्ये छापलेल्या न्यायनिर्णयाचे मराठीमध्ये भाषांतर)

प्रकाशनयोग्य

भारताचे सर्वोच्च न्यायालय
दिवाणी अपिलीय अधिकारिता

दिवाणी अपील क्र. १०५५/२०१९

प्रमोदकुमार आणि इतर १ — अपीलकर्ते

विरूध्द

झलक सिंग आणि इतर — उत्तरवादी

न्यायनिर्णय

न्या. के. एम. जोसेफ

उच्च न्यायालय यांनी दि.३१/०८/२०१२ रोजी पारित केलेल्या न्यायनिर्णय आणि आदेशा विरूध्द प्रस्तुतचे अपील विशेष अनुमतीसाठी निर्देशीत केले आहे. आक्षेपित न्यायनिर्णयाद्वारे, उच्च न्यायालय यांनी दाखल केलेला मुकदमा (उपलक्षित प्राङन्याय (ज्याचा निर्णय अगोदरच लागला आहे अशी फिर्याद किंवा मुकदमा) की जो मुकदमा हा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (यापुढे ज्याचा उल्लेख दि.प्र.सं. असा करण्यात आलेला आहे) च्या आदेश नियम २ अनुसार अवरोधीत होत आहे या

कारणास्तव खारीज करतांना मांडलेले समवर्ती निष्कर्ष रद्द केले आहेत आणि उच्च न्यायालय यांनी सदरचे प्रकरण प्रथम अपिलीय न्यायालय यांच्याकडे गुणवत्तेवर निर्णय घेण्यासाठी परत पाठविले.

२) टिकाराम नावाची एक व्यक्ति प्रतिवादी क्रमांक ४ यांचे पती आणि प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांचे वडील होते. गोंदीया गावातील खसरा क्र. १८९ मधील, ८.२२ एकर जमिन त्यांनी त्यांच्या नावावर धारण केली होती. दिनांक २१.०१.१९५९ रोजी त्यांनी जमिनीच्या एकूण ८.२२ एकर क्षेत्रापैकी ३.२० एकर जमीन अपिलकर्ते यांना विकली आणि त्यानंतर दिनांक ११/०२/१९५९ रोजी त्यांनी एकूण ८.२२ एकर जमिनीपैकी जमिनींचा उर्वरीत भाग म्हणजेच ४.८२ एकर्स जमीन ही सुद्धा अपिलकर्ते यांना विकली. टिकाराम यांचे १५/०७/१९५९ रोजी निधन झाले.

२) प्रतिवादी यांनी दि. २१/०१/१९५९ रोजीचे विक्रीखत रद्द करण्यासाठी आणि इतर दिलासा (अनुतोष) मिळण्यासाठी मुकदमा (दिवाणी मुकदमा क्रमांक १३१/१९६३) दाखल केला. मुकदम्यामध्ये प्रतिवादींनी असे अभिकथन केले की सदरची जमीन ही एकत्र कुटुंबाची वडिलोपार्जित मिळकत होती. आणि त्यांनी ती अनैतिक कारणांसाठी एकत्र कुटुंबाचे हित बाधीत होईल अशा रितीने विकली. त्यांना दारूपिण्याचे व्यसन होते आणि मिळकत विकण्याची कोणतीही गरज नव्हती.

३) सुनावणी न्यायालयाने दिनांक ३१/०१/१९६९ रोजी सदरचा मुकदमा, १९५७ साली झालेल्या वाटणीनुसार टिकाराम सदर मिळकतीचे मालक होते

असे ग्राहय धरून, खारीज केला. त्यामुळे त्यास वादजमिन विकण्याचा हक्क होता. अपिलकर्ते खरेखुरे खरेदीदार आहेत.

४) सुनावणी न्यायालयाच्या हुकूमनाम्यामुळे व्यथित होऊन प्रतिवादी यांनी दिनांक १०/०२/१९७१ रोजी अपील दाखल केले (ज्याचा क्रमांक दिवाणी अपील क्रमांक २२/१९६९ असा आहे.)

५) प्रतिवादी यांनी पुन्हा प्रस्तुतचा मुकदमा (ज्याचा क्रमांक दिवाणी मुकदमा क्रमांक ३४/१९७१ असा आहे) ज्याद्वारे त्यांनी दिनांक ११/०२/१९५९ च्या विक्री खताला आव्हान दिले आणि इतर आदेशासाठी प्रार्थना केली. सदरचा मुकदमा हा तोच मुकदमा आहे जो सुनावणी न्यायालय आणि प्रथम अपिलीय न्यायालय या दोघांनी खारीज केला आहे. सुनावणी न्यायालय यांनी वाद प्रश्नांची उत्तरे दिली आहेत ज्या मध्ये सदरचा मुकदमा, दिवाणी प्रक्रिया संहितेचे (आदेश (II) नियम (२) यांनी तसेच उपलक्षित प्राङन्याय या सिध्दांताने अवरोधीत होत आहे. पुढे असे ही आढळले आहे की सदर मुकदमा, दिवाणी प्रक्रिया संहिता चे (आदेश (II) नियम (२) च्या आधारे आणि ऊपलक्षित प्राङन्याय या सिध्दांताच्या आधारे खारिज करणे योग्य आहे. अपिलीय न्यायालय यांनी दिलेला मुकदमा खारिज करण्याचा निर्णय मुलत: दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश (II) नियम (२) च्या तरतुदी आधारे तसेच उपलक्षित प्राङन्याय याच्या आधारे मिळकतीची दुस—या वेळेस दिनांक २१/०१/१९५९ रोजी केलेली विक्री हा पुर्वीच्या मुकदम्याचा वादविषय असावयास हवा होता, या कारणास्तव दिला होता. वास्तविक पहाता

अपिलीय न्यायालय यांना असे आढळले की सुनावणी न्यायालय यांनी इतर मुददयांची दिलेली उत्तरे बरोबर दिली आहेत. या ठिकाणी याची नोंद घेतली पाहिजे की दिवाणी अपीलामध्ये पहिल्या मुकदम्यातील सुनावणी न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या प्रतिकुल निर्णय देण्यात आला आणि सदर निर्णय अंतिम झाला.

६) परंतु मा. उच्च न्यायालय यांना, सदर दोन्ही न्यायालयाचे निर्णय प्रतिकुल करतांना असे आढळले की दि.प्र.सं.चे आदेश (II) नियम (२) च्या तरतुदीनुसार पहिल्या मुकदम्यातील वादाचे कारण हे एकच असले पाहिजे. प्रस्तुत प्रकरणात टिकाराम यांनी दोनदा मिळकत अन्यक्रमित (विक्री) केली ज्यामुळे दोन वादकारण उपस्थित झाले. पुढे असेही आढळले की उपलक्षित प्राङन्याय हा सिध्दांत इथे लागु होत नाही.

७) आम्ही पक्षकारांच्या वतीने विद्वान वकिलांचे म्हणणे ऐकले आणि अभिलेख वाचले.

८) अपिलकर्ते यांचे विद्वान वकिल यांनी असे म्हणणे मांडले की मा. उच्च न्यायालय यांनी निष्कर्षाप्रती येतांना, आदेश (II) नियम (२) च्या तरतुदी अन्वये निर्णय अवरोधित होत नाही,असे मानुन स्पष्टपणे चुक केली आहे. खरं तर आदेश (II) नियम (२) च्या तरतुदी (या प्रकरणात) लागू होतात. त्यांनी आमचे लक्ष सदरच्या दोन्ही मुकदम्यांमधील वादकथनांकडे वेधुन पुढे असे म्हणणे मांडले की दुस—या मुकदम्याचे वादकारण हे पहिल्या मुकदम्यातील वादकारणासारखेच आहे. पहिला मुकदमा दाखल करण्याच्या तारखेला, मिळकतीचे दुसरे संक्रमण हे आक्षेपित करण्यासाठी

उपलब्ध होते. आणि वादकारणाचे दोन वेगळया मुकदम्यांमध्ये विभाजन करणे आणि दिलासा देण्याची विनंती करणे हा पर्याय प्रतिवादीसाठी उपलब्ध नव्हता. पण या प्रकरणात प्रतिवादीनी नेमके तेच केले आहे. त्यांनी, प्रस्तुत न्यायालयाच्या कॉफी बोर्ड वि. रमेश एक्सपोर्टस प्रायव्हेट लिमिटेड आणि ए.बी.सी. लेमिनार्ट प्रा. ली. आणि इतर १ विरूध्द ए. पी. एजन्सीज सालेम २ या न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे.

१) (२०१४) ६ एस. सी. सी ४२४

२) (१९८९) २ एस. सी. सी १६३

९) प्रतिवादीचे विद्वान वकील यांनी दि.प्र.सं. चे आदेश VII नियम १ यातील तरतुदींकडे आमचे लक्ष वेधले. त्यांनी असे नमुद केले की दोन्ही मुकदम्यांमधील वादाचे कारण वेगळे आहे. त्यांनी, परिसीमा अधिनियम १९६३ याचे अनुच्छेद १०९ या कडेही आमचे लक्ष वेधले ज्यामध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

१०९

एका हिंदू व्यक्तिद्वारे जी मित्ताक्षरा कायदान्वये नियंत्रीत होते, तिच्या वडिलांनी वडिलोपार्जित मिळकतीचे केलेले अन्यक्रमण (विक्री) रद्द करण्यासाठी	बारा वर्ष	जेव्हा मिळकतीची व्रिकी ज्या व्यक्तिला केली आहे ती व्यक्ति मिळकतीचा ताबा घेते.

१०) त्यांनी असे प्रतिपादन केले की, दुस—या विक्री खताची कालमर्यादा पहिल्या विक्री खताच्या कालमर्यादेपेक्षा वेगळी आहे. दुस—या अन्यक्रमणाच्या बाबतीत कालमर्यादा, ज्या व्यक्तिस अन्यक्रमण केले गेले

आहे त्या व्यक्तिने मिळकतीचा ताबा घेण्याच्या दिनांकापासुन बारा वर्षांचा कालावधी संपल्यानंतर संपेल. त्यांनी प्रस्तुत न्यायालयाच्या अलका गुप्ता वि. नरेंदर गुप्ता या प्रकरणातील न्यायनिर्णयाचा आधार घेतला.

३. (२०१०) १० एस्. सी. सी. १४१

११) येथे पहिला प्रश्न, ज्यावर निर्णय देण्यासाठी आम्हास विंनती करण्यात आली आहे, तो असा की मा. उच्च न्यायालय यांचे आदेश (II) नियम (२) अन्वये असलेला अडथळा, या प्रकरणामधील वस्तुस्थितीस लागू होत नाही, हे म्हणणे बरोबर आहे किंवा कसे.

१२) वर नमुद मुददयावरील निर्णयावर लक्ष वेधण्यापुर्वी सदर दोन्ही मुकदम्यामधील वाद कथनांचा उल्लेख केला तर जास्त फायदेशीर ठरेल. दिवाणी मुकदमा क्रमांक १३१/१९६३, आम्ही खालील वादकथने लक्षात घ ोतली. प्रतिवादी (वादी) हे हिंदुधर्मीय असुन ते बनारस स्कूल शासित मिताक्षरा स्कूल ऑफ लॉ अन्वये नियंत्रीत होत आहेत. जेव्हा टिकारामचे वडिल वारले त्या वेळेस टिकाराम अज्ञान होते. टिकाराम अज्ञान होते त्या काळात मिळकतीची व्यवस्था त्यांची आई बघत होती. सज्ञान झाल्यानंतर टिकारामला वाईट आणि अनैतिक सवयी लागल्या आणि तो मोठा झाल्यावर दारूबाज बनला. तसेच तो इतर ही दुर्गणांच्या आहारी गेला. त्याला खर्चिक सवयी लागल्या होत्या आणि म्हणून त्यांनी त्यांची एकत्र कुंटुंबाची वडीलोपार्जित मिळकत अनैतिक कारणांसाठी एकत्र कुटुंबाच्या हितास बाधा येईल अशा रितीने विकली परंतु नातेवाईकांच्या हस्तक्षेपानंतर, दिनांक ११/०१/१९५७ रोजी मिळकतीचे वाटणीपत्र झाले जे रितसर

नोंदणीकृत करण्यात आले.

१४) वादी क्र.२ यांचा जन्म त्यानंतर म्हणजेच दिनांक ०२/०६/१९५७ रोजी झालेला असल्यामुळे, वाटणीच्या वेळी त्यांस वरील वाटणीपत्रामध्ये पक्षकार म्हणून सामिल करू शकले नव्हते आणि केले नव्हते. वादी क्र.३ यांचा जन्म २६/०८/१९५९ रोजी झाला आणि म्हणुन त्यांचा सदर वाद मिळकती मध्ये हितसंबंध होता. वाटणीकरतेवेळी खसरा क्र. १८९ मधील ८.२२ एकर क्षेत्र हे मयत टिकाराम किंवा वादी क्र.१ यांच्या पैकी कोणाच्याही वाटणीस मिळवले नव्हते. परंतु ते त्यानंतर एकत्रित क्षेत्र असे ठेवले होते. आपणास खालील प्रमाणे मुद्दे लक्षात घेता येतील.

(ग) सप्टेंबर १९५८ च्या महिन्यामध्ये किंवा त्या दरम्यान वादींना माहिती झाले होते कि टिकाराम यांना त्यांच्या जमीनी विकायच्या आहेत. आणि म्हणुन त्यांनी ‘‘हिंदू दैनिक नवभारत, ज्याची गोंदिया व जवळपासच्या भागामध्ये जास्त विक्री होते च्या दिनांक १४ सप्टेंबर १९५८ च्या आवृत्तीमध्ये एक प्रतिषेधक नोटिस छापून आणली. ज्यामध्ये त्यानी सर्वसामान्य जनतेला मयत टिकाराम यांच्या कडून जमिनीचे कोणत्याही मार्गाने हस्तांतरण स्विकारू नये असे कळवले. त्यानंतर लगेचच वादींना असे समजले की, प्रतिवादी, मयत टिकाराम यांच्या सोबत,दावा मिळकती संदर्भात विक्रिचा करार करू इच्छितात आणि म्हणुन त्यांनी प्रतिवादींवर दिनांक ४/१/१९५९ रोजीची लेखी नोटीस बजावली आणि त्यांना परिच्छेद १(इ) या मध्ये नमुद केलेली जमीन विकत घेण्यापासून थांबण्याचे बजावले.

(३) परंतू, ताकिद आणि नोटिसा देउन सुद्धा प्रतिवादीयांनी ख. क्र. १८९ याचा काही भाग ज्याचे क्षेत्र ३.२० एकर आहे ज्याचा उल्लेख वादींच्या नकाशामध्ये प, फ, भ, म या अक्षराने लाल शाईने केला आहे ते रक्कम रू.८०००/. या तथाकथित मोबदल्याने दिनांक २१/०१/१९५९ च्या नोंदणीकृत विक्री खतान्वये खरेदी केले.

१५) प्रकरणात पुढे असे म्हटले आहे की सदर मिळकत ही वडिलोपार्जित एकत्र कुटुबांची मिळकत होती आणि सदरचे अन्यक्रमण हे गरज भागवण्यासाठी नव्हते किवा मालमत्तेवरून फायदा मिळवण्यासाठी नव्हते किंवा पुर्वापार चालत आलेले कर्ज फेडण्यासाठी नव्हते आणि म्हणून ते रद्द करण्यास पात्र आहे. वादी क्र.१ ते ३ यांचा जन्मापासूनसदर जमिनीत हितसंबध होता आणि वादी क्र.४ (टिकाराम यांची विधवा पत्नी) हिचा त्यांच्या सोबतच हिस्सा होता. मोबदला म्हणून दिलेली रक्कम हि काल्पनिक होती आणि ती कधीही दिली गेली नव्हती आणि मोबदल्याविना झालेले अन्यक्रमण हे ग्राहय नव्हते आणि म्हणून ते वादींवर बंधनकारक नव्हते. तसेच ते या कारणास्तव रद्द करणे योग्य होते. त्यांनतर पुढे काही विशिष्ट आरोप करण्यात आले होते परंतु ज्याच्याशी आपल्या काही एकसंबंध नाही.

१६) वादींनी वादपत्रामध्ये, सदरचे विक्रीखत वादी क्रमांक ४ हिच्या हितसंबधावर बंधनकारक नाही असे जाहिर होउन मिळावे तसेच जागेचा ताबा तिला देण्यात यावा किंवा दिनांक २१/०१/१९५७ चे विक्रीखत रद्द करण्यात यावा; जमिनीचा ताबा वादींना देण्यात यावा; जमिनीचा ताबा

वादींना देण्यात यावा दरम्यानच्या कालावधीतील नफयाबाबत चौकशी करण्यात यावी आणि काही इमले पाडून टाकण्यास अनिवार्य प्रतिबंध करण्यात यावा असा हुकूमनामा पारित करण्यात यावा अशा आशयाच्या दिलाशाची वादींनी मागणी केली होती.

१७) आता आपण दुसरा मुकदमा म्हणजेच दिवाणी मुकदमा क्र.३४/१९७१ यामधील वादकथनाकडे पाहूया.

१८) इथे ही वादी आणि प्रतिवादी सारखेच आहेत. त्यामध्ये, इतर गोष्टीबरोबरच खालील मुद्दे नमूद आहेत.

गोंदिया गावामध्ये स्थित, खसरा क्र.१८९ ची ८.२२ एकर्स क्षेत्रफळाची भूमीधारी जमिन ही वादी क्र. १. २. आणि ३ यांची वडिलोपार्जित जमीन आहे. वादी क्रमांक ४ हि वादी क्रमांक १ ते ३ यांची आई आहे. वादी हिंदूधर्मीय असून ते बनारस स्कूल यांनी प्रशासित केलेल्या मिताक्षरा कायदयान्वये नियंत्रित होत आहेत. टिकाराम हे अनैतिक सवयींच्या आहारी गेले होते, ते एक कोडगे दारूबाज बनले होते आणि ते अनैतिक कारणांसाठी वडिलोपार्जित जमिनी विकत होते असे आरोप त्यांच्या विरूद्ध केले होते. तसेच त्यामध्ये दिनांक ११/०१/१९५७ च्या वाटणीचा ही उल्लेख आहे त्यामध्ये खसरा क्र. १८९ च्या जमिनीबाबत असा ही आरोप करण्यात आला आहे की ८.२२ एकर्स क्षेत्रफळाची जमीन मयत टिकाराम हिश्श्यामध्ये सामील करण्यात आली नव्हती आणि ती एकत्रित ठेवण्यात आली होती. या ठिकाणी दुस—या वादपत्रामधील परिच्छेद क्र.३ उद्धृत करणे प्रस्तुत ठरेल, सदर मजकूर खालीलप्रमाणे

आहे. ‘‘परंतु ताकिद आणि नोटिसा देउनसुदधा प्रतिवादीनी वादींच्या वडिलांकडून खसरा क्रमांक १८९ या जमिनीपैकी ३.२० एकर्स चा भाग दिनांक २१/०१/१९५९ च्या खरेदीखतान्वये खरेदी केला. वादींनी सदरची विक्री रद्द करण्यासाठी प्रतिवादी विरूध्द दिवाणी मुकदमा क्र. १३१/१९६३ हा दाखल केला. सुनावणी न्यायालयाने सदरचा मुकदमा खारीज केला आणि म्हणून वादींनी सदरचा न्यायनिर्णय आणि हुकूमनामा या विरूदध दिवाणी अपील क्र.२२/६९ दाखल केले जे सहाय्यक (१) न्यायाधीश, भंडारा ४ (अ) येथे सध्या प्रलंबित आहे. त्यांनतर, प्रतिवादींचे वडिल मयत टिकाराम यांनी पुन्हा दिनांक ११/०२/१९५९ रोजी खसरा क्र.१८९ वादजमिनीपैकी ४.८२ एकर्स क्षेत्रफळाची जमीन जी वादपत्रामध्ये दाखल केलेल्या नकाशामध्ये लाल रंगात ‘क’, ‘ख’, ‘ग’, ‘घ’, ‘च’, ‘छ’, ‘ट’, ‘ठ’, ‘द’, ‘न’ आणि ‘प’ या आदयाक्षरांनी दर्शविली आहे, वर नमुद केल्याप्रमाणेच असलेल्या परिस्थितीत रक्कम रूपये ४०००/— या अभिकथित मोबदल्याने दिनांक ११/२/१९५९ च्या नोंदणीकृत खरेदीखतान्वये वादींना विकली. आणि प्रस्तत मुकदम्यामध्ये सदर विक्री रद्द करण्यासाठी विनंती केली आहे.

१९) त्यामध्ये पुढे असेही कथन करण्यात आले होते की, सदरची जमिन वडिलोपार्जित एकत्र कुटुंबाची मिळकत अशी समजली जावी आणि मिळकतीचे अन्यक्रमण (विक्री) ही गरजेपोटी नसून किंवा त्याचा हेतू मालमत्तेवर काही नफा कमवणे हा ही नसून वडिलोपार्जित कर्ज चुकवणे हा ही नाही आणि म्हणून ते रद्द करण्यायोग्य आहे.

२०) वादकथनांचा उल्लेख करतांना आता आपण माननीय उच्च न्यायालय यांनी काय निर्णय दिला याचे परिक्षण करूया. उच्च न्यायालय यांनी असे मानले की एकाच दायित्वाखाली निर्माण झालेले सगळे लागोपाठचे दावे हे सगळे मिळून एकच वादकारण प्रस्थापित करतात. त्यांनी पुढे असेही मानले की सदरच्या प्रकरणातील समजण्यास सगळयात कठिण असा मुद्दा हा आहे की येथे दोन वेगवेगळया तारखांना जमिनीच्या वेगवेगळया भागांचे अन्यक्रमण (विक्री) झालेली आहे आणि जरी ते सारख्याच पक्षकारांच्या लाभात झाले असले तरीही त्यामुळे एकापेक्षा जास्त वादकारणे निर्माण झाली. पुढे असेही आढळले की, प्रथम मुकदमा प्रथम अन्यक्रमणापुरताच मर्यादित ठेउन वादींनी दावे किंवा उपाय विभागले आहेत. दुस—या विक्री खताचे त्याच पक्षकारांच्या लाभात केलेल्या निष्पादनामुळे विभिन्न आणि वेगळे वादकारण उपस्थित झाले. उच्च न्यायालय यांनी दि.प्र.सं.चे आदेश (II) नियम (२) यामध्ये दिलेल्या उदाहरणाचा उल्लेख केला आहे.

उदाहरण

'क' एक घर 'ख' ला वर्षाला १२०० रूपये इतक्या भाडयाने देतो. १९०५, १९०६ व १९०७ या संपूर्ण वर्षाचे भाडे देय असून, चुकते झालेले नाही. १९०८ साली 'क' हा १९०६ सालच्या येणे भाडयाकरता 'ख' विरूध्द दावा करतो. १९०५ किंवा १९०७ सालच्या येणे भाडयाकरता 'क' ला मागाहून 'ख' विरूदध दावा दाखल करता येणार नाही.

२१) त्यानंतर हायकोर्ट यांनी पुढे असे प्रकरण नमूद केले की ज्यामध्ये 'क' ची दोन घरे असून त्याने ती 'ख' ला भाडयाने दिली. आणि जरी दुस—या

घराच्या भाडयाची रक्कम सुद्धा थकित असून एका घराच्या भाडयाच्या थकित रकमेसाठी मुकदमा दाखल केला. उच्च न्यायालय यांच्या मते, सदरची दोन्ही वादकारणे एकत्रित करावयाची किंवा नाही हा वादींचा प्रश्न आहे आणि मग दुसरा मुकदमा अवरोधीत होणार नाही.

२२) मोहम्मद खलील खान विरूद्ध मेहबूब अली मियान यांच्या प्रकरणात आधीचा मुकदमा औंध येथील मिळकतीशी संबंधित होता. मुकदम्यामधील पक्षकार सुन्नी पथांचे होते आणि शहाजहानपूर आणि औंध येथे असलेल्या मिळकती एक राणी बरकतुन्नीसा यांच्या मालकीच्या होत्या. पहिल्या मुकदम्यामध्ये शहाजहानपूर येथे स्थित मिळकतींचा समावेश नव्हता. माननीय न्यायालय यांनी भारतातील न्यायालयांनी मांडलेला दृष्टिकोन उचलून धरला आणि त्यांनी काढलेला निष्कर्ष की, शहाजहानपूर येथील मिळकतीच्या संदर्भातील दुसरा दावा हा आदेश (II) नियम (२) अन्वये अवरोधीत होत आहे, कायम केला. येथे सदर न्यायनिर्णयातील परिच्छेद ४५ आणि ४६ मधील मजकूराचा उल्लेख करणे फायदेशीर ठरेल कारण सदरचा मजकूर वादकारण प्रस्थापित करण्याच्या मुद्दयावर प्रकाश टाकतो.

''४५. संक्षिप्तपणे नमुद केलेले दि.प्र.सं.चे आदेश (II) नियम (२) अन्वये असे अधिनियमित होते की, जर वादीने आपल्या हक्कमागणीच्या संपूर्ण भागाच्या संबधांत दावा लावण्यात कसूर केली असेल जी पहिल्या मुकदम्या वादकारणासंबधी हक्कमागणी करण्यास तो हक्कदार असेल तर त्याबाबतीत अशा प्रकारे त्याने ज्या भागाच्या बाबतीत ती कसूर केली असेल किंवा जो भाग त्याने सोडून दिला असेल त्याच्या

संबधांत त्याला दुस—या मुकदम्यात हक्कमागणी करता येणार नाही.

हा मुद्दा मून्शी बझलूर रहिम वि. शमशुन्नीसा बेगम (१८६७) M.I.A.551, या प्रकरणात निदेर्शित केल्यानुसार.

अशा प्रकारच्या सर्व प्रकरणांमध्ये खरी कसोटी ही आहे की नवीन मुकदम्यातील हक्कमागणी चा पाया हा खरोखरच अगोदरच्या मुकदम्याचे वादकारण, जो त्या मुकदम्याचा पाया होता, यापेक्षा वेगळा आहे....

सदर नियमाचा स्पष्ट हेतू हा दाव्यांचे विभाजन टाळणे हा असून एका मुकदम्यातून अनेक मुकदमे दाखल होण्यापासून रोखणे हा देखील आहे.
४६) वादींना न्यायालयासमोर त्यांच्या न्यायिक हक्कास पुष्टी देण्यासाठी आवश्यक असलेली प्रत्येक वस्तुस्थिती, जर नाकारली गेली तर, प्रत्येक वस्तुस्थिती शाबित करण्यासाठी आवश्यक असलेल्या पुराव्यांच्या प्रत्येक भागाचा त्यात समावेश नसेल परंतू प्रत्येक वस्तुस्थितीचा समावेश असेल जी शाबित करणे गरजेचे असेल.

मास्टर ऑफ रोल्स यांनी दिलेल्या वादकारणाच्या व्याख्येशी मी सहमत आहे. आणि वादकारणामध्ये अशी प्रत्येक वस्तुस्थिती, समाविष्ट आहे आणि जर नाकारली गेली तर, ती शाबित करणे आवश्यक आहे आणि वादीस त्याने केलेली कारवाई टिकवण्यासाठी ते आवश्यक आहे.

आता वादकारणाचा प्रतिवादींनी उभ्या केलेल्या बचावाशी काही एक संबध नाही अथवा ते वादींद्वारे केल्या गेलेल्या विनंतीच्या स्वरूपावर अवलंबून आहे आणि ते वादकारणासाठी वादपत्रामध्ये नमूद केलेल्या

आधारांकडे निर्देश करतात किंवा इतर शब्दांत, ते सदर पुराव्याकडे निर्देश करतात ज्यांच्या आधारावार वादी न्यायालयास त्याच्या लाभात निष्कर्षाप्रती येण्यास विनंती करतात.

२३) प्रिव्ही कौन्सिल यांनी सदरच्या तत्त्वांचा गोषवारा परिच्छेद ६१ मध्ये दिला आहे. तो खालीप्रमाणे आहे :—

६१) प्रकरणांमध्ये मांडलेल्या आणि वर चर्चा केलेल्या तत्त्वांचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे:

१) आदेश २ नियम २ च्या तरतुदींखाली येणा—या प्रकरणांमध्ये खरी कसोटी ही आहे की नवीन मुकदम्यातील हक्कमागणीचा पाया हा अगोदरच्या मुकदम्याचे वादकारण, जो त्या मुकदम्यांचा पाया आहे, त्यापेक्षा वेगळा आहे.

२) वादकारण म्हणजे अशी प्रत्येक वस्तुस्थिती, जर ती नाकारली गेली तर, जी वादींना त्यांचा न्यायनिर्णयावरील हक्क शाबीत करण्यासाठी आवश्यक आहे.

३) जर दोन दाव्यांना पुष्टी देण्यासाठी आवश्यक असलेले पुरावे वेगवेगळे असतील तर सदरची वादकारणे सुद्धा वेगवेगळी असतील.

४) दोन वेगवेगळया मुकदम्यांमधील वादकारणे, जर सर्वसाधारणरीत्या एकच असतील तर ती एकच आहेत असे समजले जावे.

५) जर वादकारणाचा प्रतिवादींनी उभ्या केलेल्या बचावाशी काही एक संबंध नसेल किंवा ते वादींद्वारे केल्या गेलेल्या विनंतीच्या स्वरूपावर अवलंबून आहे आणि ते वादकारणासाठी वादपत्रामध्ये नमूद केलेल्या

आधारांकडे निर्देश करतात, तसेच ते इतर पुराव्याकडे निर्देश करतात ज्यांच्या आधारावर वादी न्यायालयास त्याच्या लाभात निष्कर्षाप्रती येण्याची विनंती करतात.

२४) तरीही पुढे, परिच्छेद ६३ मध्ये न्यायालयाने पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढला आहे.

६३) वादी यांनी मिळकती परत मिळवण्यासाठी दिलेल्या वादकारणामध्ये अशा वस्तुस्थितींचा समावेश आहे ज्यामुळे ते सदर मिळकतींवरील त्यांचा हक्क शाबित करण्यासाठी हक्कदार आहेत. सदरच्या बाबी या त्याच दोन्ही मिळकतीसंदर्भातील बाबी आहेत जसे की, रानी बरकतउन्नीसा या सदर मिळकतींच्या मालक होत्या: त्या दिनांक १३ फेब्रुवारी, १९२७ रोजी वारल्या: त्या सुन्नी पंथाच्या होत्या आणि मुहम्मद कायदयाअंर्तगत ते तिचे वारसदार आहेत.

पक्षकारांच्या वर्तणुकीचा विचार करता, मा. न्यायाधीश यांनी असा दृष्टीकोन घेतला की, दोन्ही पक्षकारांनी केलेली दोन्ही व्यवहारांची प्रक्रिया सारखीच होती आणि वादींच्या औध येथील मिळकतीवरील हक्क नाकारणे आणि सदरच्या नकाराच्या परिणामस्वरूप प्रतिवादींना मिळालेला शहाजनपूर येथील मिळकतीचा ताबा हे एकाच व्यवहाराचा भाग होते. या प्रश्नावर, मा. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी त्यांचे मत दोन ठिकाणी खालीप्रमाणे व्यक्त केले आहे.

‘‘आमच्यासमोरील प्रकरणात, औध येथील मिळकतीच्या बाबतीत हक्कावरील अतिक्रमण किंवा हक्काचा दुरूपयोग हे शहाजनपूर येथील

मिळकतीच्या बाबतीतील प्रकरणातील हक्कावरील अतिक्रमण व्यवहार झाला त्या काळाच्या बाबतीत किंवा स्वरूपाच्या बाबतीत भिन्न किंवा वेगळे नव्हते.

येथे पुन्हा असे नमूद करण्यात येते की, ''या ठिकाणी प्रस्तुत प्रकरणात आम्हांस असे आढळले की एक शहाजहानपूर येथील मिळकतीवरील आणि दुसरे औध येथील मिळकतीवरील दोन अपप्रवेश यांचे स्वरूप सारखेच होते आणि ते एकाच व्यवहाराचा भाग होते आणि वादींना सदर हक्क प्रस्थापित करण्यासाठी लागणारे पुरावे आणि वस्तुस्थितीनिदर्शक बाबीपण सारख्याच होत्या.

२५) या ठिकाणी, आम्ही आदेश (II) नियम (२) च्या संबंधात निर्देश करतो आणि सदर नियम खालीप्रमाणे आहे.

''२. दाव्यामध्ये संपूर्ण हक्कमागणी समाविष्ट असणे.

१) वादकारणाच्या संदर्भात वादी जी हक्कमागणी करण्यास हक्कदार असेल ती संपूर्ण हक्कमागणी प्रत्येक दाव्यामध्ये समाविष्ट असली पाहिजे. पण दावा एखादया न्यायालयाच्या अधिकारितेमध्ये आणण्यासाठी वादीस हक्कमागणीचा कोणताही भाग सोडून देता येईल.

२) हक्कमागणीचा एखादा भाग सोडून देणे—जर वादीने आपल्या हक्कमागणीच्या एखादया भागाच्या संबधात दावा लावण्यात कसूर केली किंवा तो भाग बुद्धिपुर:पर सोडून दिला तर त्या बाबतीत ती कसून केली असेल किंवा जो भाग त्याने सोडून दिला असेल त्याच्या संबधात त्यानंतर त्याला दावा दाखल करता येणार नाही.

३) अनेकांपैकी एखादया अनुतोषाकरता दावा दाखल करण्यात कसूर — एकाच वादकारणाच्या संबंधात एकापेक्षा अधिक अनुतोषाकरता हक्कदार असलेल्या एखादया व्यक्तीस अशा सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही अनुतोषाकरिता दावा दाखल करता येईल: पण न्यायालयाची परवानगी घेतली असल्यास तेवढी बाब वगळून एरव्ही, त्याने अशा सर्व अनुतोषांकरिता दावा लावण्यात कसूर केल्यास अशा प्रकारे कसूर केलेल्या कोणत्याही अनुतोषासाठी त्यानंतर त्याला दावा दाखल करता येणार नाही.

आदेश (II) नियम (२) यामध्ये अशी तरतूद आहे की वादी, वादकारणासंदर्भात संपूर्ण दावा दाखल करू शकतो आणि जो दाखल करण्याचा त्याला हक्क आहे. परंतु त्याच्यासाठी, दाव्यापैकी कोणत्याही भागावरील हक्क सोडून देण्याचा पर्याय खुला आहे.

आदेश (II) नियम (२) यामध्ये हक्कमागणीचा काहीभाग सोडून देणे आणि हक्कमागणीचा काही भाग वगळणे यामुळे होणा—या परिणामांच्या बाबतीत तरतूद आहे. त्यात असे जाहीर केले आहे की जर का वादींनी त्याच्या हक्कमागणीचा काही भाग खटला दाखल करतांना वगळला किवा जाणूनबुजून हक्क सोडून दिला तर त्या अशाप्रकारे कसून केलेल्या कोणत्याही अनुतोषासाठी त्यानंतर दावा दाखल करता येणार नाही. आदेश (II) नियम २ (३) यामध्ये, सारख्याच वादकारणाच्या बाबतीत एकापेक्षा अधिक अनुतोषाकरिता दावा दाखल करण्यात कसूर केली असेल तर त्याच्या परिणामाचा परामर्श घेण्यात येतो. अशी कसूर झाली असल्यास त्याच्या परिणामस्वरूप, वादींना अशा वगळलेल्या बाबीसाठी दावा दाखल

करता येणार नाही. यासाठी एकच अपवाद आणि तो म्हणजे ज्या बाबीसाठी त्याने माननीय न्यायालयाची संमती प्राप्त केली असेल तरच तो असे करू शकतो. वर्गो इंडस्ट्रीज (इंजि.) (प्रा.) लि. विरूध्द वेंचरटेक सोल्यूशन्स् (प्रा.) लि. (२०१३) एस्. सी. सी. ६२५ या प्रकरणातील आदेश (II) नियम (२) आणि आदेश (II) नियम २ (३) यामधील फरक संक्षिप्तपणे दर्शविला आहे. प्रस्तूत न्यायालय यांनी इतर बाबींसोबतच असेही मानले की,

''दिवाणी प्रक्रिया संहितेचा आदेश २ नियम १ यानुसार प्रत्येक मुकदम्यामध्ये एखादया वादकारणाच्या संदर्भात वादी जी हक्कमागणी करण्यास हक्कदार असेल ती संपूर्ण हक्कमागणी समाविष्ट असली पाहिजे. परंतू वादींना, जर त्यांना हवं असेल तर त्यांच्या हक्क मागणीमधील ए खादया भागाचा हक्क सोडून देण्याचा पर्याय आहे. दि. प्र.सं. चे आदेश २ नियम २ मध्ये अशा परिस्थितीबाबत नमूद केले आहे की जिथे वादी आपल्या हक्कमागणीच्या एखादया भागाच्या संबंधात ज्याचा तो हक्कदार आहे, दावा लावण्यात कसूर करू शकतो किंवा तो भाग बुद्धिपुरःसर सोडून देऊ शकतो परंतू जर वादीने असे केले तर आदेश (II) नियम २ यामध्ये असे स्पष्ट केले आहे की त्याने ज्या भागाच्या बाबतीत ती कसूर केली असेल किंवा जो भाग त्याने सोडून दिला असेल तर त्याच्या संबंधात त्यानंतर त्याला दावा दाखल करता येणार नाही. आदेश (II) नियम २ (३) यामध्ये अशी तरतूद आहे की, अशा परिस्थितीमध्ये जेथे वादी एका विशिष्ट वादकारणाच्या बाबतीत एकापेक्षा अधिक अनुतोषाचे

हक्कदार असतांना देखील जेव्हा त्या सगळया अनुतोषांकरता दावा दाखल करण्यास कसूर करतात तेथे न्यायालयाची अनुमती घेणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत न्यायालयाची अनुमती

घेतली असल्यास तेवढी बाब वगळून, वादींना अगोदर वगळलेल्या अनुतोषासाठी नंतर दावा दाखल करण्यापासून रोखले आहे. आदेश (II) नियम २ (२) आणि (३) यांमधील तरतुदींचे संयुक्त वाचन केले असता असे स्पष्ट होत आहे की, आदेश २ नियम २ च्या वरील नमूद पोट—नियमात दोन वेगळया परिस्थितीवर विचार केला आहे. उदा. जेथे वादी हक्कमागणीचा एखादा भाग ज्याचा तो हक्कदार आहे, असा भाग किंवा त्यावरील हक्क सोडून देतो आणि दुसरे म्हणजे जेथे वादी ज्यांच्यासाठी त्याने मुकदम्यामध्ये हक्कमागणी केली असती अशा अनेक अनुतोषांपैकी एक अनुतोष वगळतो किंवा त्यावरील हक्क सोडून देतो. अशा नंतरच्या परिस्थितीतच फक्त, जेथे वादी आधीच्या मुकदम्यामध्ये वगळलेल्या अनुतोषासाठी एक नंतरचा मुकदमा दाखल करू शकतो ज्यामध्ये पहिल्या मुकदम्यामध्ये वगळलेल्या विशीष्ट अनुतोषासाठी त्याने पहिल्या मुकदम्यामध्ये त्या अनुतोषासाठी हक्कमागणी करण्यासाठी मा. न्यायालयाची अनुमती घेतली होती.

दि. प्र. स. आदेश २ नियम २ (२) आणि (३) अधिनियमित करण्यामागचा हेतू शोधणे कठिण नाही. सदरचे नियम एक प्रशंसनीय तत्व अधोरेखित करतात ज्यामुळे प्रतिवादींना एकापेक्षा अनेक मुकदम्यांमध्ये जेथे अनेक अनुतोषांपैकी एखाद्या हक्कमागणीसाठी मुकदमा दाखल केल्यामुळे

होणा—या .त्रासास प्रतिबंध होतो. अशा प्रकारच्या अनुतोषासाठी फकत न्यायालयाची अनुमतीने जी स्वाभाविकरित्या न्यायालयाचे रितसर समाधान झाल्यानंतर आणि चांगल्या व पुरेशा कारणासाठी दिली जाईल, दाखल केलेला असेल.

२७) म्हणजेच, सारख्याच वादकारणासाठी दाखल केलेल्या मुकदम्यामध्ये हक्कमागणीचा एखादा भाग वगळणे किंवा त्यावरील हक्क सोडून देणे याचा परिणाम म्हणजे अशाप्रकारे वगळेल्या किंवा हक्क सोडून दिलेल्या भागासाठी वादींना मागाहून मुकदमा दाखल करण्यापासून प्रतिबंधित केले आहे. परंतु, एका वादकारणामधून उद्भवलेल्या मुकदम्यामध्ये वेगवेगळे अनुतोष मागितले असतील ; मा. उच्च न्यायालयाची अनुमती घेतलेली असेल, तरच दुसरा (नंतरचा) मुकदमा ज्यामध्ये अगोदरच्या मुकदम्यामध्ये मागितलेल्या अनुतोषापेक्षा वेगळा अनुतोष मिळण्यासाठी प्रार्थना करता येईल. आदेश (II) नियम २ यामध्ये तीन शब्दप्रयोग वापरले आहेत. प्रथमत: त्यामध्ये 'वादकारण' या शब्दाचा उल्लेख आहे. त्यामध्ये उल्लेखलेला दुसरा शब्द म्हणजे ''.....यास अनुलक्षून दावा''आणि शेवटचा उल्लेखलेला शब्द आहे ''अनुतोष''

२८) प्रतिवादींनी उभा केलेला बचाव, वादकारण म्हणजे काय हे निर्धारित करण्यात अप्रस्तुत आहे. वादींना प्रार्थिलेले अनुतोष, वादास कारण कशामुळे निर्माण झाले हे निर्धारित करण्याजोगे नाहीत. प्रिव्ही कौसिंल यांनी मुहम्मद खलील खान या प्रकरणामध्ये स्पष्टीकरण दिल्यानुसार, वादकारण म्हणजे वादी यांनी न्यायालयाने त्यांच्या लाभात अनुतोष मान्य

करण्यासाठी वापरलेले माध्यम आहे. आणि म्हणून असे म्हणता येईल की, वादकारण म्हणजे वास्तविक आणि कायदेशीर आधार किंवा आश्वासन ज्या आधारे वादी मा. न्यायालयास, सदरच्या प्रकरणाचा निकाल त्यांच्या लाभात देण्याची विनंती करतात. येथे असेही स्पष्ट होत आहे की, दोन्हीही मुकदम्यांमधील वादकारण हे सारखेच असायला हवे. सदरची दोन्ही वादकारणे सारखीच असण्यासाठी महत्त्वाचे आहे ते प्रकरणातील तथ्य.

२९) कॉफी बोर्ड (सुप्रा) या प्रकरणात प्रतिवादी यांनी निर्यात लिलावामध्ये कॉफी खरेदी केली व ती काही विशिष्ट देशांमध्ये निर्यात केली त्यांनी दोन मुकदमे दाखल केले. कॉफी बोर्ड यांनी कॉफी निर्यात करण्यासाठी शिक्का पद्धती (stamp system) उपलब्ध करून दिली होती. वादींची तक्रार अशी होती की, प्रतिवादींनी स्टॅपस् देण्यास कसूर केली आणि ते दयायला उशीर केला आणि त्यामुळे त्यांचे नुकसान झाले. या प्रकरणात मा. न्यायालयाने असा निर्णय दिला की : —

१२) मा. न्यायालयांनी, (त्यांच्यासमोरील) मुकदमा आदेश २ नियम २ यातील तरतुदीनुसार बाधित होत आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी वादींनी संबधित मुकदम्यामधील त्यांच्या वादपत्रामध्ये नमूद केलेली वादकारणे तपासली पाहिजेत (कृपया एस्. नझीर अहमद वि. स्टेट बॅंक ऑफ म्हैसूर : २००७ (११)/SCC ७५ पहा) आदेश २ नियम २ मधील युक्तीवादाची तांत्रिकता लक्षात घेता, वादकारण ओळखण्यासाठी दोन्ही मुकदम्यांमधील वादपत्रे, एकत्रितपणे वाचायला हवीत (विचार करायला हवा) जे हक्कमागणी शाबित करण्यासाठी आवश्यक आहे किंवा वादींना सदर बाब,

शाबित करण्यासाठी आवश्यक आहे. म्हणून वादकारण ओळखल्यानंतर, जर असे आढळले की, सदर दोन्ही मुकदम्यांतील वादकारण हे सारखेच आहे तर आणि असेही आढळले की नंतरच्या मुकदम्यातील दावा केलेला अनुतोषाची अगोदरच्या मुकदम्यात देखील मागणी करता आली असती तर त्या प्रकरणात नंतरचा दावा आदेश २ नियम २ अंतर्गत अवरोधित होतो.

१६) ओ. एस. क्र. ३१५०/१९८५ या मुकदम्यामधील जो अगोदरचा दावा होता, वादपत्रामध्ये प्रतिवादी जे त्यातील वादी होते त्यांनी अशी हक्कमागणी केली होती की, अपीलकर्ते, जे त्यातील प्रतिवादी होते यांनी त्यांनी खरेदी केलेल्या २६८.०८ टन कॉफी च्या निर्यातीसाठी दिनांक ११/०८/१९८२ आणि ०८/०९/१९८२ या कालावधीकरीता ICO Stamps, देण्यासाठी त्यांनी आश्वासन देऊनसुद्धा, देण्यात कसूर केली ज्याच्या परिणामस्वरूप, वादींना नुकसान सोसावे लागले. सदर बाबीच्या आधारावर, प्रतिवादी यांनी सदरच्या नुकसान व हानीच्या भरपाईची हक्कमागणी केली. प्रतिवादी यांनी, पुढे असे द्ढकथन केले की सदर मुकदम्यासाठी जेव्हा प्रतिवादी यांनी अपिलकर्ता यांच्याकडून अपीलकर्ता त्यांना ICO Stamps देतील या आश्वासनावर त्यांनी आयोजित केलेल्या लिलावामध्ये कॉफी खरेदी केली, असे वेगवेगळया तारखांना कारण घ डलेले आहे.

१७) आश्वासन देऊनसुध्दा प्रतिवादी यांना ICO Stamps, देण्यात झालेली कसूर हे वर नमूद मुकदम्याचे वादकारण आहे. या प्रकरणात प्रतिवादींना त्यांच्या हक्कमागणीच्या यशस्वीततेसाठी अपीलकर्ते यांनी केलेल्या

चुकीमुळे म्हणजेच त्यांनी (प्रतीवादीनी) खरेदी केलेल्या कॉफीसाठी ICO Stamps, देण्यात कसूर केल्यामूळे प्रतिवादींना तोटा सोसावा लागला.

३०) मा. न्यायालयाने पुढे असेही मानले की अपीलकर्ता यांनी स्टॅप्स देण्यात कसूर केली आहे हे वादींनी शाबित केल्यानंतरच वादी सदर मुकदम्यामध्ये यशस्वी होऊ शकतात. सदर मुकदम्यातील फरकाचे कारण हे कॉफीची रक्कम (किंमत) आणि ज्या दिवशी सदर कॉफी खरेदी केली तो दिनांक असे आहे.

३१) प्रतिवादी यांनी अलका गुप्ता विरूध्द नरेंदर कुमार गुप्ता या प्रकरणातील न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे. सदर प्रकरणात, अपीलकर्ती आणि उत्तरवादी यांनी नवी दिल्ली स्थित ''प'' या ठिकाणी एक संस्था चालविण्यासाठी भागीदारी संस्था स्थापन केली. त्यानंतर अविभक्त अर्धा हिस्सा विकण्यासाठी एक करार केला. परंतु उत्तरवादी यांनी विक्री मोबदला रकमेच्या अर्धीच रक्कम दिली ज्यामुळे अपीलकर्ते यांना उर्वरित रकमेसाठी मुकदमा दाखल करावा लागला. सदर दाव्यामध्ये हुकूमनामा पारित झाला. अपीलकर्ते यांनी नंतरचा आणखी एक मुकदमा, दिनांक ०५/०४/२००० या तारखेपासून, जी सदर भागीदारी करार निष्यादित झाला ती तारीख आहे, दिनांक ३१/०७/२००४ या तारखेपर्यंतचा हिशोब उपलब्ध करून देण्यासाठी दाखल केला. अपीलकर्ते यांच्या मते, भागीदारी इच्छेनुसार होती आणि त्यानंतर ती विसर्जित झाली. प्रस्तुत न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या मताच्या विरूध्द मत नोंदविले की सदर मुकदमा आदेश (II) नियम २ यातील तरतुदींनुसार

आणि प्राङन्याय तत्वानुसार अवरोधीत होत आहे. न्यायालयाने गुरूबक्ष सिंह विरूध्द भुरालाल (ए.आय.आर. १९६४ ए. सी.१८१०) या प्रकरणातील न्यायनिर्णय अनुसरले आहे आणि त्याबरोबरच खालीलप्रमाणे निर्णय दिला :—

मा. न्यायालयाच्या खंडपीठाने सदरचा निर्णय खालील कारणांमुळे कायम केला आहे की, सदर मुकदमा दि. प्र. सं. च्या आदेश २ नियम २ अनुसार अवरोधीत होत असून अपीलकर्ती ने तिच्या सर्व मागण्यांबाबत प्रतिवांदीसोबत दिनांक २९/०६/२००४ रोजीच्या बयाणा कराराअंतर्गत समझोता केला आहे. प्रस्तुतचे अपिल त्यानंतर विशेष अनुमती याचिकेद्वारे दाखल केले आहे.

प्रथम मुकदम्यातील वादकारण हे दिनांक २९/०६/२००४ रोजीच्या विक्रीखतानुसार किंमतीची रक्कम अदा न करणे हे होते तर दुस—या मुकदम्यातील वादकारण हे भागीदारी करार दिनांक ०५/०४/२००० च्या अंतर्गत घटित झालेल्या भागीदारी संस्थेच्या लेख्यांचे हिशोब चुकते न करणे हे होते केवळ 'र' येथे असलेल्या सीावर मिळकतीचा विक्रीकरार आणि 'तक्षिला इंस्टिटयुट' या नावाने तेथे चालू असलेला व्यवसाय आणि दुसरा मुकदमा एका भागीदारी संस्थेविषयी आहे जिचा व्यवसाय 'प' येथे 'तक्षिला इंस्टिटयूट' या नावाने चालू असणे असे असले तरीही सदरचे दोन्ही मुकदमे एकाच वादकारणाशी संबधित आहेत ज्यामुळे वि.प्र.सं. च्या आदेश (II) नियम २ च्या तरतुदी लागू होतात.

३२) प्राङन्याय या प्रतिकथनाच्या बाबतीत, येथे न्यायालयाने खालीलप्रमाणे

निर्णय दिला आहे :

प्राङन्यायाचे प्रतिकथन हे वादींच्या हक्कमागणी मान्य होऊन मिळण्याच्या अधिकारावरचा निर्बंध आहे. सदरचे प्रतिकथन हे स्पष्टपणे शाबित झालेले असले पाहिजे, विशेषत: जेथे प्रतिबंध होण्याची मागणीच अर्थापन्न प्राड.न्यायावर आधारित आहे. वादी ज्याच्याविरूध्द अर्थापन्न प्राडन्यायानुसार प्रतिबाधित होण्यासाठी विनंती करण्यात आलेली आहे, त्यांना अशा प्रकारच्या प्रतिकथनाची कल्पना असायला हवी आणि त्याविरूदध त्यांचे मत मांडण्याची संधी मिळायला हवी. प्रस्तूत प्रकरणात अर्थापन्न प्राङन्यायाचे प्रतिकथन करण्यात आले नव्हते तसेच अपिलकर्ता — वादी यांना अशा प्रकारच्या प्रतिकथनावर आधारीत प्रकरणाचा सामनाही करावा लागलेला नाही. रेस ज्युडिकेटा (प्राड.न्याय) म्हणजे ''अभिनिर्णित झालेली गोष्ट'' म्हणजेच असा वाद ज्यावर अंतिमत: न्यायिक निर्णय झालेला आहे. अर्थापन्न प्राङन्यायाचे तत्व हे, दिवाणीप्रक्रिया संहितेचे कलम ११ मध्ये दिलेले स्पष्टिकरण IV जेव्हा स्पष्टिकरण III सोबत वाचले जाईल त्यावेळेस त्यापैकी दोन्हीमुळे, प्रकरण प्रत्यक्षपणे आणि सारत: वादग्रस्त आहे असे मानन्यात येईल. वरील गोष्टी लक्षात घेता, जरी बचावाचे किंवा हल्ल्याचे एखादे विशिष्ट कारण सुरूवातीच्या मुकदम्यामध्ये देण्यात आले नव्हते, तरी ते अर्थापन्न प्राड:न्यायाच्या तत्त्वानुसार, नंतरच्या मुकदम्यामध्ये देता येउ शकते. अर्थामन्न प्राड.न्यायाचे तत्त्व हल्ला आणि बचावाचे कारण याचा परामर्श घेते तर दि. प्र. सं. चे आदेश २ नियम २ हे एकाच वादकारणासबंधी मागणी करता येऊ शकत होते असे परंतु

मागणी न केलेल्या अनुतोषासंबंधीत आहेत.

३३) भारताचे संघराज्य विरूध्द एच. के. ध्रुव {(२००५) १० एस.सी.सी. २१८} या प्रकरणांत, मा. न्यायालयाने, इतर गोष्टींसोबतच असेही मानले की, अपीलकर्ता यांचे विद्वान वरिष्ट वकिल यांचे कथन तसेच प्रतिवादी, ज्यांनी स्वत:ची बाजू स्वत: मांडली, यांचे कथन ऐकल्यानंतर आमचे समाधान झाले आहे की, मा. उच्च न्यायालयाने घेतलेल्या दृष्टिकोनात काहीही दोष आढळत नाही. दि.प्र.सं.चा आदेश २ नियम २ च्या तरतुदींनुसार अधिनियमित झालेला प्रतिबंध लागू होण्यासाठी, वादकारण, ज्यावर नंतरचा मुकदमा आधारलेला आहे, हे मागणीदारांना, ज्यावेळेस त्यांनी एखाद्या न्यायालयासमोर पहिल्या मुकदम्यातील हक्कमागणीच्या अंमलबजावणीसाठी प्रार्थना केलेली असेल, त्यावेळेसच उद्भवलेले असावयास हवे.

उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयामध्ये आढळलेली आणि नमूद केलेली वस्तूस्थिती ज्याच्याशी मतभेद असण्याचे आम्हास कोणतेही कारण आढळत नाही तसेच प्रतिवादींनी मागणी केलेला दुसरा अनुतोष हा पहिल्या अर्जात उद्भवलेल्या हक्कमागणीचा भाग होऊ शकत नाही. येथे दि. प्र. सं. चे आदेश २ नियम २ याद्वारे अधिनियमित होत असलेला प्रतिरोध स्पष्टपणे लागू होत नाही.

३४) एस. नजीर अहमद वि.स्टेट बॅंक ऑफ म्हैसूर {(२००७) ११ एस. सी.सी.७५} या प्रकरणात अपीलकर्ते/प्रतिवादी यांनी दोन नग गहाण ठेऊन वादींच्या बॅंकेकडून काही रक्कम कर्जाऊ घेतली होती. बॅंकेने दाखल

केलेल्या पैशाच्या बाबतीतील मुकदम्यामध्ये हुकूमनामा पारित झाला होता. परंतू हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीचे कामकाज अयशस्वी ठरले कारण गहाण ठेवलेल्या बसचा शोध लागला नाही.

अंमलबजावणीच्या दाव्यामध्ये बॅकेने गहाण ठेवलेल्या मिळकतीच्या विक्रीसंबधी विनंती केली परंतू अपीलकर्ते यांनी, गहाण वस्तूच्या बाबतीत हुकुमनामा पारीत झालेला नाही आणि म्हणून बॅक फकत मिळकत जप्त करू शकते आणि सरळसरळ विकू शकत नाही, असा मुद्दा उपस्थित करू, त्यास विरोध केला. सदरचा आक्षेप कायम केला गेला. त्यावर बॅकेने समन्याय गहाणाचा अंमलबजावणीसाठी दुसरा मुकदमा दाखल केला. प्रस्तुत न्यायालय यांनी असा दृष्टीकोन घेतला की दुस—या मुकदम्यातील वादकारण हे वेगळे होते. मा.न्यायालयाने पुढे आदेश XXXIV नियम १४ चा आधार घेऊन पुढीलप्रमाणे निर्णय दिला.

१४) अशा प्रकारे मांडलेले तत्त्व लागू केल्यास, अशा निष्कर्षाप्रत येणे शक्य नाही की दि.प्र.सं. च्या विशेषत: आदेश ३४ नियम १४ च्या संदर्भात समन्याय गहाणाच्या अंमलबजावणीसाठी दाखल केलेला मुकदमा, दि. प्र. सं च्या मध्यम मुदतीच्या कर्जाच्या वसुलीकरीता दाखल केलेला अगोदरचा मुकदमा लक्षात घेता आदेश २, नियम २ अन्वये परिणामित होत असून सदरची दोन्ही वादकारणे, जरी ती एकाच व्यवहाराचा भाग असली तरीही वेगळी आहेत. जरी अन्यथा, दि. प्र. सं. चा आदेश ३४ नियम १४ सह नियम १५, आदेश २ नियम २ अन्वये लागू होत असलेला प्रतिरोध, जर असल्यास तो काढून टाकतो. अपीलकर्ते यांचे विद्वान वकिल यांनी

घेतलेला रंगून उच्च न्यायालय यांचा पी वाय् यू म्युनिसिपालिटी विरूध्द यू. टन न्यायिन (एआयआर १९३३ रंगून १५८) यामध्ये दिलेल्या न्यायनिर्णयाचा आधार, त्यांना प्रस्तूत मुकदमा दि. प्र. सं. चे आदेश २ नियम२ याद्वारे प्रतिरोधीत होत आहे अशी याचना करण्यास सहाय्यभूत होत नाही. कारण सदरच्या न्यायनिर्णयाद्वारे आदेश ३४ नियम १४ याचा परिणाम दर्शविलेला आहे ज्याचा उल्लेख आम्ही अगोदरच वर नमूद केलेला आहे.

३५) प्रथमत: आपण उत्तरवादी यांचे विद्वान वकिल यांनी केलेला युक्तिवाद लक्षात घेऊया तो असा की परिसीमन कायद्याच्या अनुच्छेद १०९ अन्वये परिसीमनाचा कालावधी अन्यसंक्रामिती यांनी ताबा घेतल्या दिवसापासून सुरू होतो आणि म्हणून दिनांक २१/०२/१९५९ च्या विक्री खतासंदर्भातील दुस—या मुकदम्यासाठीचे वादकारण हे अगोदरच्या मुकदम्यातील वादकारणापेक्षा वेगळे असेल कारण तो मुकदमा अगोदरच्या तारखेच्या विक्रीखतासंदर्भातील होता आणि त्या परिसीमनाचा वेगळा कालावधी होता. आम्ही अशा मताचे आहोत की, अनुच्छेद १०९ अंतर्गत परिसीमनाचा कालावधी हा पहिल्या विक्रीखतासंदर्भातील परिसीमन कालावधीपेक्षा वेगळा आहे आणि तो आदेश (II) नियम २ अन्वये लागू होणारा प्रतिरोध वगळण्यासाठी लागू होत नाही. आदेश (II) नियम २ चे मुलभत तत्त्व हे आहे की कोणत्याही व्यक्तिस सारख्याच वादकारणासाठी दोनदा त्रासातून जायला लागू नये. सर्व हक्कमागण्या व अनुतोष ज्या एका वादकारणाच्या परिणामस्वरूप आहेत, त्या एकाच

दाव्यामध्ये अंतभूत झाल्या पाहिजेत. आदेश (II) नियम २ यामध्ये, संवैधानिकरित्या ठरवून दिलेल्या वेळेनंतर दावा दाखल करण्याचा तात्पुरता हक्क निश्चित करणा—या तत्वाची तरतूद केली आहे. जर हाच आदेश (II) नियम २ चा मूलभूत हेतू असेल तर ज्यावेळेस पहिला मुकदमा दाखल केला त्यावेळेस, दुस—या विक्री व्यवहारास सुद्धा आव्हान देता येऊ शकते कारण ते एकाच वादकारणातून उद्भवलेले आहेत आणि ते दोन वेगळे वादकारण नाहीत हे माहिती असुनही, फकत वेगळया परिसीमन कालावधीची तरतूद असल्यास सदर बाब, आदेश (II) नियम २ अन्वये असलेल्या प्रतिरोधास बाधा आणू शकत नाही.

३६) आता आपण उत्तरवादी यांचे विद्वान वकिल यांचा दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश (VII) नियम १ यावर आधारीत युक्तीवादाचा विचार करूया. आदेश (VII) नियम १ यामध्ये वादपत्रात अंतर्भूत असावयाचे तपशील यांसंबधी तरतूद आहे. त्यामध्ये, इतर बाबीबरोबरच, अशाही बाबी, ज्यांमुळे वादास कारण उद्भवले आणि ते केव्हा उद्भवले, यांचा उल्लेख असावा. वरवर पाहता, प्रतिवादींचा युक्तिवाद हा परिसीमन कायद्याच्या अनुच्छेद १०९ या संबंधीत आहे. अनुच्छेद १०९ मध्ये तरतूद केल्यानुसार वादास कारण, विक्रीखताच्या दिनांकापासून सुरू होत आहे आणि म्हणून सदर मुकदम्यामध्ये दोन वेगवेगळे परिसीमन कालावधी आहेत. सदर बाब असे दर्शविते की दुस—या मुकदम्यामध्ये उद्भवलेले वादकारण हे पहिल्या मुकदम्यातील वादकारणासारखे नाही. आम्ही या मताचे आहोत की सदर युक्तिवाद हा कोणत्या बाबींमुळे वादास कारण निर्माण होते याविषयीच्या

चुकीच्या समजावर मांडला गेला आहे. अनेक निर्णयांमध्ये वादकारण स्पष्ट करण्यात आले आहे. वादकारण म्हणजे वस्तुस्थितींचा समूह जो, जर विरोध केला गेला तर, शाबित करणे गरजेचे आहे. परंतु प्रिव्ही कौंसिल यांनी निर्धारित केल्यानुसार, त्याचा अर्थ असाही असू शकतो की वादकारण म्हणजे वादींनी न्यायालयाच्या हस्तक्षेपाची मागणी करण्यासाठीचे माध्यम आहे.

३७) ज्याच्या आधारावर वादींनी हुकूमनामा पारित करण्यासाठी विनंती केली आहे असा कायदेशीर आधार/वस्तुस्थितीसंबधीच्या साच्याचे आधारविधान कोणते आहे?

३८) प्रस्तुत प्रकरणात आम्ही पक्षकथनाची नोंद घेतली आहे. वादींची हकिकत अशी आहे की सदरची मिळकत वडिलोपार्जित मिळकत असून त्यांचे मयत वडिल टिकाराम यांना अनेक वाईट सवयी होत्या तसेच त्यांना दारूचे आणि इतरही व्यसन होती. ते मिळकती विकण्यास निघाले होते. परंतू त्यांच्या हितचिंतकांनी मध्यस्थी करून वाटणी घडवून आणली. परंतू खसरा क्र. १८९ मधील ८.२२ एकर्स ची जमिन वाटणीपत्रातून वगळण्यात आली होती. त्यांनी ८.२२ एकर्स ची जमिन, कसलीही कायदेशीर गरज नसतांना आणि एकत्रित कुटुंबाचा कसलाही फायदा नसतांना, विकायचे ठरवले. सदर व्यवहाराचा पहिला भाग जो दोन भागांचा मिळून बनला होता, तो दिनांक २१/०१/१९५९ च्या विक्रीखताशी संबंधित होता.आणि तोच पहिल्या मुकदम्याच्या वादविषय होता. सदरचा प्रथम मुकदमा दाखल करतेवेळी, वादींचे पूर्वाधिकारी — हितसंबंधीत यांनी अगोदरच नोंद

घेतल्यानुसार दुसरे विक्रीखत देखील निष्पादित केले होते जे उर्वरित ८. २२ एकर्स च्या जमिनीविषयी होते. सदर मुकदम्यांमध्ये, सदरच्या दोन्ही व्यवहाराविषयी वस्तुत: सारखीच दृढ कथने अंतर्भूत आहेत. प्रथम मुकदमा १९६३ साली तर दुसरा मुकदमा १९७१ साली दाखल झाला होता.

३९) आम्ही या मताचे आहोत की, अशा परिस्थितीमध्ये हे असे एक प्रकरण आहे की, ज्यामध्ये वादींनी दुसरे विक्री खत रद्द करण्यासाठी अनुतोषाची हक्कमागणी करावयास हवी होती. हे असे प्रकरण नाही की जेथे, वादींनी प्रथम मुकदमा दाखल केला त्यावेळेस दुसरे विक्रीखत निष्पदित झालेले नव्हते. आम्ही, एका क्षणासाठी सुद्धा, प्रथम मुकदमा दाखल झाल्यानंतर त्या पाठोपाठ निष्पादित झालेल्या विक्रीखताचा परिणाम जाहिर करणार नाही कारण आम्हाला अशा प्रकारच्या विक्रीसंदर्भात होणा—या परिणामाविषयी जाहिर करावयाचे नाही. आम्ही फक्त यावर भर देत आहोत की, उत्तरवादी / वादी यांच्यासाठी, त्यांच्या पूर्वाधिकारी—हितसंबंधीत यांनी केलेल्या दुस—या विक्री संदर्भात अनुतोषाची हक्कमागणी करण्याचा पर्याय खुला होता. आणि जास्त महत्त्वाचे हे आहे की सदर विक्री त्याच पक्षकारांच्या (प्रतिवादींच्या) जे आमच्यासमोरील प्रकरणात अपीलकर्ते आहेत, लाभात झाली होती.

४०) मा. उच्च न्यायालय यांनी आदेश (II) नियम ३ च्या तरतुदीवर आधारीत कारणावर कार्यवाही केली आहे. वादींना वादाची कारणे एकत्रित करण्याचा पर्याय खुला आहे. आदेश (II) नियम ३ मध्ये असे नमूद आहे की,

३. वादकारणांचे संयोजन

१) अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त एरव्ही, वादी एकाच प्रतिवादीच्या किंवा त्याच संयुक्त प्रतिवादीच्या विरूध्द निरनिराळी वादकारणे एकाच दाव्यात एकत्र करू शकेल आणि कोणत्याही वादींना ज्यामध्ये प्रतिवादीच्या विरूध्द किंवा त्याच संयुक्त प्रतिवादीच्या विरूध्द ते संयुक्त प्रतिवादीच्या विरूध्द ते संयुक्तपणे हितसंबंधित असतील अशी वादकारणे एकाच दाव्यात एकत्र करता येतील.

२) वादकारणे एकत्रित करण्यात आली असतील त्या बाबतीत, दाव्याच्या संबंधातील न्यायालयाची अधिकारिता ही दावा सुरू करण्याच्या तारखेस दाव्याच्या एकुण विषयवस्तूच्या रकमेवर किंवा मूल्यावर अवलंबून राहिल.

४१) हे नि:संशयपणे खरे आहे की कायदा एखाद्या पक्षकारास एका मुकदम्यामध्ये एकापेक्षा अधिक वादकारणे एकत्रित करण्यास भाग पाडत नाही. आणि वादींपूढे हा पर्याय खुला असतो की, ते, जर त्यांना हवे असेल तर एकाच पक्षकारांच्या विरोधात एकापेक्षा अधिक वादकारणे एकाच मुकदम्यात एकत्र करू शकतात. परंतू हे नि:संशयपणे खरे आहे की, आदेश (II) नियम २ मधील प्रतिरोध हा, फक्त जेव्हा हक्कमागणी जी वगळली किंवा त्यावरील हक्क सोडून दिला आणि अनुतोष जे वगळले आणि त्यावर दावा दाखल केला नाही, हे एकाच वादकारणामधून उद्‌भवलेले असतात, तेव्हाच उद्‌भवतो. जर एकापेक्षा अधिक वादकारणे असतील तेव्हा आदेश (II) नियम २ लागू होणार नाही. हे देखील नि:संशयपणे सत्य आहे की, आदेश (II) नियम २ एक तांत्रिक नियम

स्पष्ट करतो कारण त्याचा परिणाम हा एखाद्या पक्षकाराच्या त्याचे गा—हाणे मा. न्यायालयासमोर मांडण्याचा मार्गातील अडथळा ठरू शकतो. परंतू अगोदरच नोंद केल्यानुसार, येथे आणखी एक तेवढेच महत्त्वाचे तत्त्व आहे की कोणत्याही व्यक्तिस एकाच वादकारणासाठी दोनदा त्रास झेलावा लागू नये.

४३) म्हणून एकाच वादकारणासाठी, जेव्हा वादींनी प्रश्नांकित विक्री खताबाबत मुकदमा दाखल करणे वगळेलेले असतांना आम्हांस असे वाटते की, आदेश (II) नियम २ अंतर्गत प्रतिरोध या ठिकाणी लागू होतो. प्रकरणाच्या या दृष्टिकोनातून आम्हास, उपलक्षित प्राङन्याय याच्याशी निगडीत प्रश्नांवर निकाल देणे गरजेचे वाटत नाही.

वर उल्लेखलेल्या वस्तुस्थितीवरून आम्ही अपील मान्य करीत आहोत आणि उच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय रद्द करीत आहोत. पक्षकारांनी आपापला खर्च सोसावा.

.....न्यायाधीश

(अशोक भूषण)

नवी दिल्ली:

१० मे, २०१९

.....न्यायाधीश

(के. एम्. जोसेफ)

नकार (डिस्क्लेमर)

‘‘ या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल.’’

DISCLAIMER

“The Translated judgment in vernacular language is meant for the restricted use of the litigant to understand it in his/her language and may not be used for any other purpose. For all practical and official purposes, the English version of the judgment shall be authentic and shall hold the field for the purpose of execution and implementation”.

X X X X X X